**सार्वजनिक सुटटी दि.१९, २५, २६ व २८ मार्च, २०१७ या दिवशी कार्यालये सूरू ठेवणेबाबत.**

**परिवहन आयुक्त कार्यालय,**
प्रशासकीय इमारत, ३ रा व ४ था मजला,
सरकारी वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

कार्यालयनी परिपत्रक क्र. 33 /संकीर्ण ४६१६/का.८(१)/वाहन नोंदणी/२०१६/जा.क्र. 445 दि. 17 MAR 2017.

## परिपत्रक

गुढीपाडव्याच्या मूहूर्तावर राज्यभरात नविन वाहनांची मोठया प्रमाणात खरेदी होत असते. गुढीपाडव्याच्या दिवशी अशा नविन वाहनांना नोंदणी क्रमांक मिळून जनतेला वाहनाचा ताबा मिळावा, तसेच त्या अनुषंगाने महसूल वसूली, उद्दीष्ट पुर्तता करणे याकरिता राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालये / उप प्रादेशिक परिवहन कार्यालये दिनांक १९, २५, २६ व २८ मार्च, २०१७ या सार्वजनिक सुटटीच्या दिवशी सूरू ठेवणे आवश्यक आहे.

सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना कळविण्यात येते की, त्यांनी दिनांक १९, २५, २६ व २८ मार्च, २०१७ रोजी वाहन नोंदणीचे व त्या अनुषंगिक कर वसूलीचे कामकाज सूरू ठेवावे. सदर कामासाठी आवश्यक असणारा संबंधीत अधिकारी व कर्मचारी वर्गास कार्यालयीन वेळेस उपस्थित राहून वाहन नोंदणी व कर वसूलीचे कामकाज करण्याच्या सूचना देण्यात याव्यात. याबाबतच्या पुढील सूचना आपल्या अधिपत्याखालील उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांना देण्यात याव्यात.

याबाबत जनतेच्या सोयीसाठी स्थानिक वर्तमानपत्रातून आवश्यक प्रसिध्द करण्यात यावी. तसेच दिनांक १९, २५, २६ व २८ मार्च, २०१७ रोजी झालेल्या कर वूसलीबाबत अहवाल सादर करावा.

**(प्रसाद महाजन)**
**परिवहन सह आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत,**

१. सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी / प्रादेशिक परिवहन कार्यालय.
२. सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी / उप प्रादेशिक परिवहन कार्यालय.
३. परिवहन आयुक्त यांचे स्वीय सहायक, परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
४. मा.अपर परिवहन आयुक्त / सह परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५. उप आयुक्त (लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
६. परिवहन आयुक्त कार्यालयातील सर्व नियंत्रक अधिकारी.
७. लेखा अधिकारी-१, पिरवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
८. आदेश नोंदवही

(कृ.मा.प)....



PDF created with pdfFactory Pro trial version www.pdffactory.com